कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत सन २०१७-१८ करिता अन्नधान्य पिकांतर्गत कडधान्य पिकाचे उत्पादन वाढीसाठी अतिरिक्त कार्यक्रम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक : असुअ ०३१७/प्र.क्र. १२/राकृवियो कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ११ ऑक्टोंबर, २०१७

वाचा:-

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०३१७/प्र. क्र. १८/ राकृवियो कक्ष, दि. १३/०४/२०१७
२. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दि.१९/०४/२०१७
३. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र No. CPS -2-16/2017 NFSM, दि. ०२/०५/२०१७
४. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. असूअ ०३१७/प्र.क्र. १२/राकृवियो कक्ष, दि.१५ मे, २०१७
५. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.असुअ ०३१७/प्र.क्र.१२/राकृवियो कक्ष, दि.०७ जून, २०१७
६. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र.F.No.३-६/२०१७-NFSM, दि.०५.०९.२०१७
७. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. Comm/Ext-१/CR-१/२६१/१७, दि.२९.०९.२०१७
८. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. २-१६/२०१७-NFSM, दि.०५/१०/२०१७

प्रस्तावना :-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अर्थसहाय्याने राबविण्यात येत असून या अभियानांतर्गत भात, गहू, कडधान्य व भरडधान्य या अन्नधान्य पिकांबरोबरच ऊस व कापूस या वाणिज्यीक पिकांवर आधारीत पिक पध्दतींचा देखील समावेश केला आहे. सदर अभियांतर्गत समाविष्ट पिकांच्या उत्पादन व उत्पादकतेत वाढ करणे, शेत जमिनीची सुपीकता व उत्पादकता वाढविणे, रोजगारांची संधी निर्माण करणे व शेतक-यांच्या उत्पादनात वाढ करणे ही प्रमुख्य उद्दीष्ट आहेत.

शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान -अन्नधान्य पिकांसाठी एकूण ₹ २४०३४.३७ लाख रकमेचा वार्षिक कृती आराखडयास संदर्भाधिन दि.१५ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली होती. तदनंतर केंद्र शासनाने दि.०५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्व्ये राज्यास अभियानांतर्गत रब्बी हंगामाकरिता कडधान्य पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी वाढीव कार्यक्रम राबविण्याचे सूचित केले होते. त्यानुषंगाने शासनाच्या मंजूरीने कृषि आयुक्तालयाच्या संदर्भाधिन दि.२९.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास अभियानांतर्गत कडधान्य पिकांचा रु.२१८७.५० लाख (केंद्र हिस्सा

रु.१३१२.५०० लाख + राज्य हिस्सा रु.८७५.०० लाख) रकमेचा वाढीव कार्यक्रम मंजूरीस्तव सादर करण्यात आला होता.

केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधिन दि.०५ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर वाढीव कृती आराखडयास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान -अन्नधान्य पिकांतर्गत रु.२१८७.५० लाख रकमेच्या कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे -

शासन निर्णयः

१. सन २०१७-१८ करिता कृषि उन्नती योजनेंतर्गत - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - अन्नधान्य पिकांतर्गत कडधान्य पिकांकरिता ₹२१८७.५० लाख (केंद्र हिस्सा रु.१३१२.५०० लाख + राज्य हिस्सा रु.८७५.०० लाख) रकमेच्या वाढीव कार्यक्रमास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर वाढीव कार्यक्रमाचे घटक / उपघटक निहाय मंजूर आर्थिक व भौतिक लक्ष्यांकांचे विवरण सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केले आहे. सदर अभियानाची केंद्र व राज्याच्या ६०:४० आर्थिक सहभागाच्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यात यावी.

३. सदर अभियानाच्या अंमलबजावणीकरिता केंद्र व राज्य हिस्स्याचा निधी ६०:४० प्रमाणात वेळोवेळी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे आयुक्त (कृषि) यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर निधी केंद्र व राज्य हिस्स्याच्या उपलब्ध लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा -

४. अभियानांतर्गत संदर्भाधिन दि.१५ मे, २०१७ रोजीच्या शासन निर्णयातील दिशा निर्देशानुसार सदर ₹२१८७.५० लाख रकमेच्या वाढीव कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१२१३४१४३४२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र: वरीलप्रमाणे

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.12 13:32:29 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति:-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

४. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
७. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
९. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१०.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
११.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१४.सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१५.वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
१६.मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१७.मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती.

परिशिष्ट-अ

सन २०१७-१८ करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-कडधान्य पिकांसाठी वाढीव कार्यक्रम

				(रक्कम ₹ लाख)	
अ. क्र.	तपशिल	अनुदानाचा दर	परिमाण	प्रस्तावित लक्षांक	
				भौतिक	आर्थिक
	प्रमाणित बियाणे वितरण				
१	कडधान्य	२५००	क्विं	७००००	१७५०.०००
	संसाधन संवर्धन तंत्र / साधने				
२	I) धान्य पेरणी यंत्र	१५०००	संख्या	१०५०	१५७.५००
	प्रभावि सिंचन साधने				
३	I) पंपसंच	१००००	संख्या	१३००	१३०.०००
	Ii) पाईप	५०	मीटर	३०००००	१५०.०००
	एकूण				२८०.०००
	एकंदर एकूण (१+२+३)				**२१८७.५००**
केंद्र हिस्सा :-					**१३१२.५००**
राज्य हिस्सा :-					**८७५.०००**